
# मांदियाळी



गणेश भारतराव रासने

॥श्री:॥

॥ कृष्णम् वन्दे जगद्गुरुम् ॥

# ॥मांदियाळी॥

गणेश भारतराव रासने

ई साहित्य प्रतिष्ठान

# मांदियाळी


## लेखक : गणेश भारतराव रासने

**D-14/5, Birla Copper Township,**

**At Po. Dahej, Tal. Vagra, Dist. Bharuch. Gujarat - 392130.**

**rasganesh79@gmail.com**

**+919924894503**



मुखपृष्ठ
गणेश भारतराव रासने



*या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण व नाट्य, चित्रपट किंवा इतर रूपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.*

This declaration is as per the Copyright Act 1957 read with Sections 43 and 66 of the IT Act 2000.. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

ई-साहित्य प्रतिष्ठान (esahity.com)
www.esahity.com
esahity@gmail.com

प्रकाशन : २८  जानेवारी २०२२
पौष कृष्ण एकादशी शके १९४३

©esahity Pratishthan®2022

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

# अर्पण

मला श्रीमंत करणाऱ्या

पुस्तकांना

गणेश

# मनात आले ते




आजोबांकडून हरिपाठाचे बाळकडू मिळाले. लहानपणी किर्तनाला टाळकरी म्हणून उभे राहण्याचे भाग्य लाभले. चांदोबा, चंपक पासून सुरू झालेल्या गाडीला 'मृत्यूंजय'चे इंधन मिळाले. ती जी भरधाव वेगाने सुटली की आजतागयत तिचा प्रवास अखंड सुरू आहे. COEP ला ॲडमिशन घेतल्यावर पुण्यनगरीत दाखल झालो आणि आभाळ ठेंगणे झाले! बरीच नाटकं, कार्यक्रम (लाईव्य) पाहिली. पुस्तकं मिळवण्यासाठी प्रदर्शने, मेळावे, रद्दीवाले, अप्पा बळवंत चौक अक्षरशः पिंजून काढले. पुणे नगर वाचन मंदिर, British Library यांचे सदस्यत्व मिळवले. ५०० च्या वर पुस्तकं होती, सर्व वाचनालयाला व शाळेला दिली, अर्थात ई-बुक्स मिळवल्यावर. सध्या १२३ पुस्तकं (९७ मूळ, २६ अनुवाद), १२११ ई-बुक्स आहेत. स्वाध्याय, तत्वज्ञान मासिक, पंचांग, ज्योतिषशास्त्र ही वेगळी. स्वाध्याय - युवाकेंद्र, वक्तृत्व स्पर्धा, पथनाट्य; दादांच्या लिखाणातून खूप


प्रेरणा, जीवन जगण्याची कला मिळाली, way of thinking, way of life पार बदलून गेले. दादांची व स्वाध्यायची सर्व पुस्तकं उपलब्ध, वाचली आहेत. तत्वज्ञान मासिकाच्या १०-१२ वर्षांच्या प्रति आहेत. आळंदी येथे वारकरी संप्रदायाचा व्यासंग लाभला.

डिटेक्टिव्ह, मिस्टरी कथा विशेष आवडतात. शेरलॉक होल्म्स, नॅन्सी ड्रिव, हर्क्यूल पायरो, मिस मार्पल ही विशेष आवडती पात्रं. हॅरी पॉटरचा खूप मोठा फॅन, वाट पाहून सर्व पुस्तकं मिळवली, हिन्दी आणि मराठीत सुद्धा, Fanfiction version सुद्धा वाचल्या. Agatha Christie, Dan Brown, Sidney Sheldon, John Grisham, Paulo Coelho, सुधा मूर्ती, पुलं, रणजीत देसाई, शिवाजी सावंत, वपू, किती नावं घ्यावीत! श्रीमान योगी, स्वामी, राधेय, सखी, युगंधर यांची तर पारायणं झालीत.

गाण्याची आवड. ज्योतिषशास्त्राची व आकडेमोडीची आवड असल्यामुळे पत्रिका बनवायला शिकलो. संकलनाची आवड. सध्या असलेल्या व पुढे हव्या असणाऱ्या पुस्तकांची यादी संकलित आहे, ईबुक्स सहित. १०८ गीत, आरत्या, गुजराती गरबा यांचा संग्रह. वाचलेल्या बऱ्याच पुस्तकातून आवडती व बोधप्रद वाक्यं संकलित करून ठेवली आहेत. संकलनाच्या वेडातूनच वडिलांना वाचताना सोपी होईल अशी मोठ्या फॉंट व ईपब मध्ये श्रीज्ञानेश्वरी संकलित झाली आणि ई साहित्य प्रतिष्ठान ने ती प्रकाशित केली.

हा कथासंग्रह सुद्धा मिळवलेल्या अनुभवांचे संकलन, ‘मांदियाळी’ आहे. या कथा २०-२२ वर्षांपूर्वी COEP ला असताना लिहीलेल्या आहेत.

Cover photo केदारनाथला जाताना रूद्रप्रयाग जवळचा आहे. गंगेचा प्रवाह हा गंगोत्री ते बंगाल महासागर मधील संपर्कात येणाऱ्या प्रत्येक थेंबाची एक उत्कृष्ट 'मांदियाळी' आहे. मोठा दगड हा माझा अभिमान - ego असून तो मला - लहान दगडाला - त्या पवित्र प्रवाहात सामावून जाण्यापासून रोखतो आहे असे मला वाटते. त्या पवित्र प्रवाहात सामावून गेल्यावर मी सुद्धा 'गंगा' होईल - my life's final destination.




गणेश……

या ज्ञानेश्वरीवर क्लिक करताच
ती उघडेल आणि वाचता येईल
पण त्यासाठी किंडल रीडर हवा.
मोबाईलवर ईपब रीडर app मिळते.
तेही चालेल.

कथानुक्रम

1. डुलकी
2. उशीर
3. लक्ष्यबदल
4. आय विश
5. दरवळ
6. नाद ब्रह्म
7. सुगंध
8. मांदियाळी

# डुलकी

‘सकाळी लवकर उठून अभ्यास करणे' हा 'व्यायाम' (तारेवरची कसरत!) आम्हाला कधी जमलाच (जमलीच!) नाही. मुळातच आम्ही 'सूर्यवंशी'! सूर्यदेवांचा उदय झाल्याशिवाय आम्हाला 'गादीतून उगवणे' आवडत नाही. त्यात पुन्हा आम्ही निसर्गप्रेमी (का असु नये!)! प्रातःकालीच्या साखर झोपेत पडलेल्या स्वप्नांमधल्या गुलाबी 'निसर्गाचा' आस्वाद घ्यायचे सोडून आम्ही कसले उठतोय!

पण कधी लवकर उठण्याचा प्रयत्न केला नाही असे मात्र नाही. मुळातच आम्हाला सूर्योदय पहायला फार आवडतो (होऽऽ का!). म्हणजे पुस्तकात वाचून, बरं का! त्यात पुन्हा पुस्तकातून सूर्योदयाबद्दल इतकं वाचलं आहे की आता सूर्योदयावर एखादा प्रबंध लिहिता यावा (अर्थात सूर्योदय न पाहताच!).

तर केलेल्या, म्हणजे आईबाबांनी करवून घेतलेल्या प्रयत्नांबद्दल! बऱ्याचदा आईबाबा सकाळी लवकर उठवून पुस्तक हातात देत. (आईबाबाच ते!). मग थोडा वेळ कसंतरी ते पुस्तक नुसतेच चाळल्या जाई (ते अभ्यासाचं असायचं, नाहीतर तेवढ्या वेळात दोन पानं वाचून झाली

असती!). थोड्या वेळा नंतर पापण्या बंद होऊ लागत (यालाच 'पापण्या जड होणे' म्हणतात!) आणि आमचं झकास डुलकी देणं सुरू होई!

डुलकी पण साधी नाही बरं का! आमचीच डुलकी ती, साधी असून कशी चालेल! कमरेपासून वरचा भाग हळूहळू डावी-उजवीकडे झोके घेऊ लागे. कधी काटकोण सुध्दा तयार होई. पलंगावर बसल्यावर तर विचारायलाच नको! असा झोका जाई की आई लगेच सावरायला येई, पडू नये म्हणून! पण आई येईपर्यंत आम्ही ताठ! असा पुन्हा झोक जाई, पुन्हा आई धावे आणि पुन्हा आम्ही सरळ! मग आई कंटाळून आमचा नाद सोडून देई. थोड्या वेळानंतर आम्ही फरशीला समांतर पडलेले असू! आणि कपाळाला टेंगूळ!

आमच्यात टेंगूळ येणं म्हणजे एक प्रतीक होतं! आम्ही सकाळी अभ्यासाला लवकर उठलो (काही शंका!) या कर्तुत्वाची ती खूण असायची! एकदा तर पाणी तापवणाऱ्या स्टोव्ह जवळ बसलेलो असताना डुलकी लागली आणि आमचे केस (केसं) जळता जळता राहिले (म्हणे!)! आणि हे जग एका अमरीश पुरीला (किंवा अनुपम खेर म्हणा!) मुकले!

*२४/११/१९९९*

*बुधवार, सकाळी ५:१०*

# उशीर

ती तिच्या मैत्रिणींसोबत एका टेबला भोवती बसलेली. माझं लक्ष तिच्याकडे. तिच्याही ते लक्षात आलेलं. तशी तोंडओळख होतीच, पण बोलण्याचं धाडस अजून केलं नव्हतं. मी तिच्या अगदी समोरचा पण थोडा लांबचा टेबल धरून बसलो. ती मनासोक्त गप्पा मारण्यात दंग. अधुनमधुन माझ्याकडेही तिरक्या नजरेनं बघत होती. मी तिच्या डोळ्यात पाहताच पुन्हा नजर खाली व गप्पा सुरू. असं बऱ्याच वेळा झालं. मग खाऊन झाल्यावर तिने एक कटाक्ष माझ्याकडे टाकला व ती निघून गेली.

हे असे प्रसंग नेहमी घडतात. जवळजवळ तीन महिन्यापासून मी तिच्या मागे फिरतोय. तिलाही हे माहीत आहे. पण अजून बोलायचा धीर होत नाही. ती सुद्धा माझ्याकडे बघते, पण तिच्या डोळ्यात कसलेच भाव नसतात. न रागाचे, न प्रेमाचे. अगदी निरागस भाव!

ती मला खूप आवडते. ती छान दिसते, छान हसते, छान बोलते, पण कुणास ठाऊक का, तिच्याशी बोलायला गेलो की मी नेहमी मागे फिरतो. धाडसच होत नाही.

माझे हे शेवटचे वर्ष होते. तिचे हीं शेवटचेच. शेवटचे सहा महिने उरलेले असतानाच ती भेटली, म्हणजे दिसली. आधी ही पाहिली होती पण त्या दिवशीचं दिसणं काही औरच होतं! काय दिसत होती! सकाळच्या सोनेरी किरणांत न्हाऊन निघालेली, दवानं भरलेली फुलं जशी टवटवीत दिसतात, तशीच ती मला वाटली. तेव्हाच वाटलं होतं की जाऊन तिच्याशी बोलायचं, तिच्या गालावरची खळी अलगद टिपायची, तिचा मऊ-मुलायम रेशमी हात हातात घ्यायचा, तिच्या निळया डोळयात डोळे घालून बसून रहायचं, पण छे ! हे मन म्हणजे कल्पनांतच जगत असतं. त्याला काही करायचं म्हटलं की ते घाबरतं. जे सुख त्याला एखादी गोष्ट करून मिळवायचं असतं, ते न करता ही, कल्पनेतच ते सुख ते मिळवीत असतं. त्यातच ते समाधानी असतं.

हळूहळू परीक्षा संपत आली. शेवटचा पेपर. आज जीवाची फार तगमग होत होती. आतील प्रेम लाव्हा सारखा उफाळून येण्यासाठी धडपडत होता. पेपर देऊन बाहेर आलो. आणि समोर ती दिसली. अचानक काय झालं कळेना, पण मी तिच्याकडे जवळ-जवळ धावलोच. आणि एकदम शब्द बाहेर पडले, "मला तुझ्याशी बोलायचंय". तिला ही कल्पना होतीच. ती म्हणाली, "चल, बोट क्लब वर जाऊ". आम्ही BC वर आलो. एका

झाडाखाली बसलो. मला समजेना काय सांगू नी कसं सांगू, आणि माझ्या नकळत मी बोलू लागलो.

"माझं तुझ्यावर प्रेम आहे. तू मला आवडतेस. गेले कित्येक दिवस तुझ्याशी बोलायचं होतं. पण धीर होत नव्हता. आज आपल्या कॉलेजचा शेवटचा दिवस. राहवलं नाही, म्हणून तुला सगळं सांगितलं".

"मला ही तुझं प्रेम हवंच होतं. किंबहुना, तू केव्हा बोलतोस याचीच मी वाट पाहत होते. पण..?".

"पण काय?".

"आता फार उशीर झालाय". तिच्या स्वरात वेदना होती.

"म्हणजे?".

"माझं... माझं लग्न ठरलंय. दोनच दिवस आधी तो मला पाहून गेला. माझ्याशी धीटपणे बोलला. आम्ही कॉफी प्यायला गेलो आणि नकळत मी त्याची झाले."

".........".

"आता….आता फार उशीर झालाय, गणेश".

ती निघुन गेली.

आणि मी…..!

# लक्ष्यबदल

"तू मला फार आवडतोस", ती म्हणाली.

हे एकुण त्याला आनंदाचे भरते आले.

"पुन्हा एकदा सांग, तू काय म्हणालीस ते. माझा माझ्या कानांवर विश्वासच बसत नाहीये!" तो म्हणाला.

"तू मला फार आवडतोस. खरं तर फार दिवसांपासून सांगायचं होतं. पण मनंच करत नव्हतं. वाटलं होतं, तू रागावशील".

"अगं, ह्या एका वाक्यासाठी मी किती तळमळतोय. मीच तुझ्याशी बोलणार होतो, पण मला ही तुझी भीती वाटत होती. आज मला किती आनंद झालाय म्हणून सांगू? हा आनंद आपण साजरा करायला हवा."

"तू नेहमी म्हणतोस ना मी तुला चहा करून देत नाही. चल घरी. आज तुला चहा पाजते मस्तपैकी, माझ्या हातचा."

"वाऽह! क्या सीन है", तो म्हणाला, तिचा हात धारायला पुढे झाला. आणि….!

आणि तो पलंगावरून धाडकन् खाली पडला!

तर ते त्याचं स्वप्न होतं. तो आणि ती लहानपणापासून एकाच शाळेत होते. एकत्र खेळत, अभ्यास करत ते मोठे झाले होते. आता ही दोघं एकाच महाविद्यालयात शिकत होते. त्याचं तिच्यावर प्रेम होतं. पण तिला हे कसं सांगावं हेच त्याला कळत नव्हतं. तो अतिशय बेचैन होता. त्याने कित्येक रात्री अशाच तळमळत काढल्या होत्या. झोप आली तरीही अशी स्वप्नं पडून पुन्हा तो जागा होई. आणि पुन्हा तीच बेचैनी त्याला त्रास देऊ लागत.

बरं, हे एकदम तिला जाऊन सांगावं तर त्यांची मैत्रीच संपुष्टात आली असती. कारण जर तिच्या मनात तसं काही नसेल तर मग तिला त्याचा राग येणार होता व ती स्वतःहून मैत्री संपवेल अशीही शक्यता होती.

त्याच्या डोळ्यात नेहमी ह्याच भावनांची रेलचेल असायची तर ती अतिशय शांत होती. त्याचे डोळे फार बोलके होते तर तिची नजर अतिशय ठंड होती. त्याच्या डोळ्यात त्याचं मन उतरलेलं असायचं तर तिच्या

डोळयात खोलवर डोकावून ही काहीच तळ लागत नसे. त्यामुळे तिच्या मनात काय आहे हे कळायलाही काही वाव नव्हता व विचारायचा त्याला धीर होत नव्हता.

तिचा स्वभाव फार वेगळा होता. ती केवळ त्याची मैत्रीण होती एवढच. एरवी महाविद्यालयात ती अतिशय खेळकर असे. एकमेकांशी मस्करी करण्यात दोघं पटाईत होती. त्यामुळे त्यांना बरीच मित्रं होती. ती दोघं कधीच एकटी नसत. कोणीतरी सोबत असेच. महाविद्यालयात ती नेहमीच चांगलं वागायची, पण तसेच त्याला घरी यायचा ही कधी आग्रह करीत नसे. तो स्वतःहूनच तिच्या घरी जात असे. तिने कधी त्याला साधा चहा ही करून दिला नव्हता. आणि म्हणूनच तिला 'सांगू का नको' ह्या द्विधा मन:स्थितीत तो होता. तिचा नकार तसा स्पष्टच होता, पण तरी त्याला थोडी आशा ही होतीच!

आणि एक दिवस त्याने धाडस करून तिला विचारलंच! तिने कठोर शब्दांत त्याला नकार दिला. त्याचं हृदय शतशः विदीर्ण झालं. पण तिला त्याच्याशी काही घेणं नव्हतं. ती नंतर त्याच्याशी बोलली नाही की तिने कठोर शब्द वापरल्याबद्दल त्याची क्षमा ही मागितली नाही.

मात्र, त्याची अवस्था फार कठिण होती. त्याला नकाराची अपेक्षा होती, पण त्याने त्याची तयारी केली नव्हती. त्यामुळे तो अगदी निराश झाला. तसा तो हुशार होता. वर्गात नेहमी पहिला येणाऱ्यांपैकी होता. त्याने स्वतःला सावरलं. झाल्या प्रकाराबद्दल त्याला फार वाईट वाटले आणि त्याने तिला पत्र लिहुन तिची क्षमा मागितली. पुन्हा पहिल्यासारखीच मैत्रीची अपेक्षा केली. पण तिने त्याला प्रतिसाद दिला नाही. त्यावर त्याला वाईट वाटलं व त्याने तिला पुन्हा एक पत्र लिहिलं. त्यात एकच वाक्य होतं.

"मला नकार दिल्याचा एक दिवस तुला पश्चाताप होईल. नक्कीच".

आणि पत्र देताना त्याने तिला भावी जीवनाबद्दल शुभेच्छा दिल्या.

नंतर तो पूर्णपणे अभ्यासाला लागला. आता त्याला असं काही करून दाखवायचं होतं की तिलाच काय, साऱ्या जगाला त्याचा हेवा वाटावा. आणि हे करण्यासाठी तो वचनबद्ध होता.

त्याने पदवी प्राप्त केली. मग तो उच्च शिक्षणासाठी अमेरिकेला गेला. तिथं त्याने बरीच प्रगती केली. जे जे शिकता येईल ते ते तो शिकत गेला. तिथं त्याने बरेच मोठे मोठे प्रोजेक्ट्स केले. त्याला अमेरिकेतील

मोठ्या मोठ्या कंपन्यांनी गलेलठ्ठ पगारांच्या नोकऱ्या, आलीशान फ्लॅट्स व गाड्यांसकट, देऊ केल्या. पण त्याला आपल्या मातीचा अभिमान होता!

तो परत "आपल्या भारतात" आला. त्याने अमेरिकेत केलेले प्रयोग भारतात यशस्वीपणे राबवले. भारत सरकारच्या मदतीने त्याने भारतात त्याच्या विषयामध्ये बऱ्याच सुधारणा केल्या. त्याची स्वतःची अशी एक कंपनी उभी केली. दुसरी पुर्ण होण्याच्या मार्गावर होती.

असाच एकदा तो आपल्या ऑफिसच्या केबिनमध्ये बसला होता. त्याला काहीतरी काम आठवलं. तो बाहेर पडला. तेवढ्यात त्याचे लक्ष स्वागत कक्षाकडे गेलं. त्याला तिथे एक चेहरा दिसला. त्याच्या मनाची कालवाकालव झाली.

तिथे ती उभी होती! त्याला निर्दयपणे नकार देणारी! त्याचं हृदय तोडणारी!

ती स्वागत कक्षावर त्याची अपॉईन्टमेन्ट घेत होती! तिला त्याची भेट हवी होती!

# " आय विश "

तो घरी आला. तसा त्याला उशीरच झाला होता. पाहतो तर दाराला कुलूप. म्हणजे ती अजून आलेली नव्हती. त्याने आपल्याकडील चावीने कुलूप उघडले. आत येऊन तो सोफ्यावर आदळला. खरंतर ती तिथे असती तर त्याला फार बोलली असती. दोघांनीही पै-पै साठवून तो सोफा घेतला होता आणि म्हणून तो नीट वापरावा असं तिचं म्हणणं होतं. सोफ्यावर असं जोरात बसलेलं तिला अजिबात आवडत नसे. ती तिथे नसल्यामुळे तो जरा सुखावला, पण त्याच्या लक्षात आले की ती जर आता घरात असती तर तो जास्त सुखावला असता. तिने त्याला पाणी आणूण दिले असते व चहा ही पाजला असता.

ती सुद्धा त्याच्यासारखीच नोकरी करीत होती. दोघांच्या वेळा जवळजवळ सारख्याच, ऑफिसला जायच्या आणि घरी यायच्या सुध्दा. पण आज का कुणास ठाऊक, तिला जरा जास्तच उशीर झाला होता. ती अजून का आली नाही याचा विचार करत असतानाच दार वाजलं. ती आत आली. फार दमली होती. तिला जरा बसावसं वाटलं. पण त्याने लगेच चहाचा हुकूम सोडला. पाणी मागू लागला. तिला फार राग आला. ती बसली आणि तिने डोळे मिटले. त्याने पुन्हा चहा मागितला. तरीही ती

तशीच पडून राहिली. मग तो चिडला. म्हणाला, " अगं, तुला ऐकु येत नाही का, मी काय म्हणतोय ते? मी आताच दमून आलोय आणि मला चहा हवाय. देत का नाहीस लवकर करून?".

ती: "अहो, मी सुद्धा आताच आलेय ना. आणि मी सुद्धा दमलेय. नंतर करते." पण त्याला जसा लगेच चहा हवा होता.

तो: "मला आज ऑफिसमध्ये खूप काम होते. तिकडे बॉसने आधीच खूप डोकं खाल्लंय, आता तू जास्त शीण देवू नकोस. मला आताच चहा हवाय".

ती: "अहो, असं काय करताय? मला सुद्धा आज खूप काम होते. म्हणूणच तर उशीर झाला. मी तुम्हाला पाणी मागत नाही, पण मला थोडं शांत पडू द्या. मला ही चहा हवाय. थोड्या वेळाने करते".

पण तो काही ऐकायला तयार होईना.

मग काय? दोन्हीकडे सारखीच आग लागली होती.

आणि भडका उडाला…..! म्हणजे, अबोला सुरू झाला.

X-----X-----X

त्याच्या दुसऱ्या दिवसाची गोष्ट.

तो शांतपणे ऑफिसमध्ये आपल्या खुर्चीवर बसून आपलं काम करत होता. काम करता करता जेवणाची वेळ झाली. तो उठला व इतर मित्रांसह ऑफिसमधल्या कॅंटीन कडे निघाला. अर्थातच, तिने सकाळी उठून तयार करून दिलेला डबा त्याच्या हातात होता. त्याने डबा उघडून पाहिलं. त्याच्या आवडीचं मसाला वांगं डब्यात होतं. तो खूष झाला. काल आपण उगाचच तिच्याशी भांडलो असं त्याला वाटलं. त्याच्या मित्रांनी लगेच त्याचा डबा हिसकावून घेतला. त्यांनाही त्याचा डबा आवडायचा. आज सगळेच त्याच्या डब्यावर तुटून पडले व इतकी छान भाजी आणल्याबद्दल त्याचं व त्याच्या बायकोचं कौतुक करू लागले. एक जण म्हणाला, "का रे, वहिनीला हे सगळे करायला फार लवकर उठावे लागत असेल, नाही? पुन्हा त्यांनाही नोकरीवर जायचं असतं म्हटल्यावर त्यांची खूप धावपळ होत असेल?".

तो: "हो रे, पण मी असतोच की मदतीला. मी माझ्या बायकोला प्रत्येक कामात मदत करायचा प्रयत्न करतो. मला तर वाटते की प्रत्येक नवऱ्याने आपल्या बायकोला घरकामात मदत केली पाहिजे, मग ती नोकरी करत असो, वा नसो. 'श्यामची आई' मध्ये नाही का श्याम आईची सगळी कामं करतो? बायकांची कामे केल्याशिवाय पुरुषाला पूर्ण पुरुष होताच येत नाही."

दुसरा एकजण म्हणाला,"हे पटतंय रे. पण इथून घरी गेल्यावर काही करायची इच्छाच राहत नाही. सकाळी सुद्धा ऑफिसची घाई असते. म्हणूण मग सगळं तीच करते. आम्ही फक्त खातो, पितो आणि आराम करतो".

तो: "हुत्, आपल्याला ते जमतच नाही. त्यात आपली बायकोसुद्धा नोकरी करीत असेल तर मग तिला मदत केलीच पाहिजे. अरे, ती सुध्दा माणूसच आहे. ती जसा आपला आर्थिक भार वाहून नेते तसे आपण गृहकार्य वाहून नेलं पाहिजे. तिला कार्यालयात आपल्या प्रमाणेच सतरा कटकटी निस्तराव्या लागतात, आपल्या एवढंच काम करावं लागतं. घरी पण तेच, दारी पण तेच. तिला जरा तरी मदत केलीच पाहिजे".

तेवढ्यात त्याचं लक्ष बाजूला उभ्या असलेल्या बॉसकडे गेलं. बॉसनेही त्याच्या नजरेला नजर दिली व ते हसले, त्याच्याजवळ येत त्याला म्हणाले, "आय ऍप्रीशिएट यूवर व्ह्यूव्ज, यंग मॅन. गूड. कीप इट अप".

"थँक्यू सर", तो एवढंच म्हणाला आणि त्याची नजर आपोआप खाली वळली.

# दरवळ

'पु.ल.' या दोन अक्षरांनीच अख्खे मराठी साहित्य विश्व व्यापून टाकल्यासारखं वाटतं. मराठी माणसं शेवटपर्यन्त या दोन अक्षरांकडून पु.ल.दे. म्हणून मागत राहिली आणि हे दोन अक्षरं शेवट पर्यंत मराठी रसिकांची अपेक्षा पुरवत राहिले.

पुलंचं विपुल व हरतऱ्हेचं लेखन शिवाय त्यांच्या इतर कलाकृती बघता 'पुलं आपल्यात नाहीत' असा भास होणं सुध्दा अशक्य आहे. असा विचार जरी मनात आणला तरी वाटतं "छे! काल तर ते मला बटाट्याच्या चाळीत भेटले. त्यांच्या पोंबुर्पेकर, एच. मंगेशराव, राघुनाना, बाबलीबाई यांना भेटून, हसून हसून पुरेवाट झाली..."

'असा मी असामी' मध्ये त्यांचा बेंबट्या ऊर्फ धोंडो भिकाजी कडमडेकर किती सहजपणे 'आपलं' जीवन 'आपल्याच' समोर उलगडून दाखवतो. 'आपल्या एका लुगड्याच्या खरेदीसाठी नवऱ्याचा अर्धा अर्धा रविवार खाणारी बायको' असणारा हा नवरा आपल्याला 'दुकानदारांशी

हुज्जत घालायची पराकाष्ठेची तयारी हा तर खरेदीशास्त्राचा पाया आहे' हे किती हुशारीने समजावून देतो.

पुलंचा विनोद नेहमी स्वतःवर बेतलेला असा आहे. स्वतःला कमीपणा देऊन विनोद फुलवणं यात पुलंचा हातखंडा. 'ही नसती उठाठेव' मधील प्रस्तावना याचं उत्कृष्ट उदाहरण आहे. महाराष्ट्राला आपल्या साहित्याच्या माध्यमाने भरभरून हसवणाऱ्या दोनच व्यक्ती - एक आचार्य अत्रे व दुसरे पुलं. आचार्य अत्रे कुणाचा तरी बळीचा बकरा करीत पण पुलं स्वतःचाच बळी देत.

पुलंच्या विनोदाचा आणखी एक वेगळेपणा म्हणजे त्यांचा विनोद आशयपूर्ण आहे. 'बटाट्याची चाळ' व 'असा मी असामी' त दोन पिढ्यांतील अंतर स्पष्टपणे जाणवते. पण या दोन पिढ्यांत संवाद आहे. वाद बराच कमी आहे. नव्यांचा नवेपणा व जुन्यांचा जुनेपणा यात सांगड घालण्याचा प्रयत्न आहे. आणि म्हणूनच 'जेवताना "गिळा फुकटचं मिळतंय ते!" म्हणणारे आमचे निर्थरूप, आजारी पडलों की ओल्या पंचानं मारूतीला शंभर प्रदक्षिणा घालीत' अशी वाक्यं वाचली की जुन्या पिढीबद्दलचा आदरभाव दुणावतो आणि नव्या पिढीने 'काहीतरी' गमावलंय म्हणून हळहळ वाटते.

जाता जाता पुलंचं आणखी एक वाक्य ऐकवतो,

"आयुष्यात मला भावलेलं एक गुज सांगतो, उपजीविकेसाठी आवश्यक असणाऱ्या विषयाचं शिक्षण जरूर घ्या, पोटापाण्याचा उद्योग जिद्दीनं करा, पण एवढ्यावरच थांबू नका. साहित्य, चित्र, संगीत, नाटयं, शिल्प, खेळ यातल्या एखाद्या तरी कलेशी मैत्री जमवा. पोटापाण्याचा उद्योग तुम्हाला जगवील, पण कलेशी जमलेली मैत्री तुम्ही का जगायचं सांगून जाईल".

# " नाद ब्रह्म "

'तो' जगातील पहिला पुरुष. 'ती' जगातील पहिली स्त्री. पण तो आणि ती फक्त शारीरिक आकर्षनामुळेच जवळ आली नव्हती. त्यांच्यात एक अभंग असा दुवा होता. ते नातं जगावेगळं नातं होतं. त्याला तिच्याशिवाय आणि तिला त्याच्याशिवाय पर्याय नव्हता, पण केवळ याच आधारावर ते नातं टिकून होतं असं नाही. त्यांच्यात प्रेमाचं असं वेगळंच नातं होतं. त्याला ती आपली, जी आपल्याला आयुष्यभर सोबत करील अशी, सहचरीणी वाटायची, तर तिला तो आपला, जो आपला आयुष्यभर सांभाळ करील असा, सहचर वाटायचा. त्यांचं फक्त दोघांचंच असं ते जग होतं.

आणि मग तिसऱ्याची चाहुल लागली! तो तिला आणखी जपू लागला. ती त्याच्यावर जास्तच प्रेम करू लागली. आणि त्यांच्याच रक्तातून एक इवलासा जीव जन्माला आला. त्या जीवाला कुठे ठेऊ न कुठे नको असे त्याला झाले, तर तिला कधी एकदा त्या जीवाला छातीशी धरीन असे झाले. त्या इवल्याश्या जीवामुळे त्यांचं सारं जगच बदलून गेलं. पहिलं प्रेमाचं नातं आणखीनच दृढ झालं. हा आपलाच अंश आहे, आपल्यातूनच ह्याचा उगम झाला आहे, म्हणून त्याला फार समाधान वाटले, तर आपला अंश आपल्याच दुधावर वाढतोय म्हणूण तिला सुखाचं भरतं आलं.

असेच एकदा तो आणि ती आपल्या जीवाला खेळवत बसली होती. काही तरी करण्यासाठी म्हणूण ती आत गेली. तो तान्ह्याला जमिनीवर ठेऊन दगड टोकदार करू लागला. त्याला कसलीतरी चाहूल लागली. त्याने इकडे तिकडे पाहिले. आठ ते दहा 'चमकते डोळे' त्याला समोरच्या झाडीत दिसले. आणि तो सर्दच झाला! त्याला काय करू काही सुचेना. 'ते डोळे' त्याच्या इवल्याश्या जीवाकडे, त्याच्या अंशाकडे निरखून पाहत होते. वेळ फार थोडा होता. तो जेवढ्या वेळात त्याच्या पिलापर्यंत पोहोचेल, त्याच्या आधीच 'ते डोळे' त्याच्या तान्हुल्यावर तुटून पडणार होते. आणि मग त्यांचं जीवन अगदी भयाण होणार होतं. तिला 'बाळाला आत घेऊन जा' हे कसे सांगावे असा त्याला प्रश्न पडला. कारण त्यावेळेस 'शब्द' नव्हते. तेवढ्यात त्याला 'ते भयानक डोळे' पुढे सरकताना दिसले.

आणि त्याला काय झाले कुणास ठाऊक - तो जोरात ओरडला - अगदी पोटाच्या तळापासून, मनापासून, आपल्या जीवाबद्दल असणाऱ्या प्रेमापासून - आणि तोच बहुदा मानवाच्या मुखाग्रातून बाहेर पडलेला 'पहिला शब्द'! ती 'आरोळी' - आपल्या बाळावर असणाऱ्या प्रेमाने ओथंबलेली, ममतेने भरलेली!

ती पटकन बाहेर आली. तिला ही फार आश्चर्य झालं होतं. काय प्रकार आहे तिच्या लक्षात आला. तिने पटकन बाळाला उचलले आणि ती आत गेली. त्या आरोळीने 'ते डोळे' ही भेदरले आणि शिकार हातची गेली म्हणून पळून गेले.

हा अगदी छोटासा प्रसंग. त्याच्या आणि तिच्या आयुष्यात घडलेला. पण ह्या प्रसंगामुळे माणूस बोलायला शिकला. हळूहळू वेगवेगळे शब्द आले, भाषा तयार झाल्या. नवे नवे शब्द येत राहिले. जुने झाले ते गेले. आणि माणसाची अखंड बडबड जी सुरू झाली ती सुरूच राहिली!

वेगवेगळया लोकांच्या वेगवेगळया भाषा असल्या तरी प्रेमाची एकच भाषा असते. आणि जगाच्या पाठीवर कुठेही कोणालाही ती कळू शकते. कारण भाषेशा जन्मच प्रेमातून झालेला आहे. आपल्या इवल्याश्या जीवाबद्दल असणाऱ्या भावनाच भाषेच्या, शब्दाच्या जन्माला कारणीभूत झाल्या आहेत.

मूल जन्माला आल्यावर रडतं, पण त्याचं रडणंही आपल्याला सुखावून जातं. कारण त्याच्या तोंडातून निघालेला पहिला शब्द, पहिला स्वर, पहिली आरोळी ही प्रेमाचं प्रतिक आहे, ममतेचं प्रतिक आहे. ती पहिली आरोळी, तो पहिला स्वर विसरणं केवळ अशक्य!

# " सुगंध "

"किती दिवसांनी भेटतो आहेस?" ती. स्वरात थोडीशी नाराजी.

"अगं, वेळच मिळाला नाही. शेवटी ठरवून आलो. अगदी सगळी कामं बाजूला ठेवून", मी तिची नाराजी दूर करण्याचा प्रयत्न करत म्हणालो.

"बरं, म्हणजे मला भेटायला आता तुझ्याकडे वेळ नाही तर? मग आज तरी कशाला आलास?"

"अगं, असं काय करतेस? आता आलोय ना, मग माझ्याशी नीट बोलायचं सोडून असं का वागतेस? चल, तिकडे त्या झाडाखाली बसू. सावलीत तू ही शांत होशील".

"तसं नाही रे! तू इतके दिवस भेटला नाहीस म्हणूण फार राग आला होता. तोच सुरुवातीला व्यक्त झाला. आता प्रेम व्यक्त करते! चल".

जाता जाता सहज तिचा हात झाडावरील गुलाबाकडे गेला व तो गुलाब ती तोडणार इतक्यात मी तिला थांबवलं.

"का तोडतेस ते सुंदर फूल?"

"आवडलं म्हणूण घेतलं तर बिघडलं कुठे!"

"असं 'आवडलं म्हणून घेतलं'चं तंत्र सगळेच वापरू लागले तर काय शिल्लक राहील जगात, ऑं? झाडावरचं फूल शक्यतो तोडू नये".

मी खाली पडलेला एक गुलाब उचलून तिच्या हातात दिला. तिने तो घेतला आणि म्हणाली, "हे काय, तू मला खाली पडलेलं फूल देणार?"

"हो! कारण या फुलात जो मायेचा ओलावा असतो, तेवढा झाडावरील फुलात नसतो. झाडा वरील फूल हे आईच्या मांडीवरील बाळासारखं असतं. झाड त्याला वाढवतं, मोठं करतं. का? तर त्याने आपल्या सुवासाने सारा आसमंत दरवळून टाकावा, एखाद्या थकल्या भागल्या जीवाला सुध्दा त्याच्याकडे बघून टवटवी यावी म्हणून. ते फूल तोडणं म्हणजे आईचे ममत्त्व हिसकावून घेण्यासारखं आहे. म्हणून ते फूल खाली पडेपर्यन्त झाडावर असणंच चांगलं असतं. विनाकारण त्याला कधीच तोडू नये. आता तू ते तोडलं असतं, दोन-तीन वेळा त्याचा वास

घेतला असता आणि फेकून दिलं असतं. मग त्यासाठी झाडावरचंच फूल कशाला हवं. खाली पडलेलं ही चालेल की!"

"हो रे, माझ्या लक्षातच नाही आलं".

"बघ, या खाली पडलेल्या फुलाचा वास घे. या झाडावरील फुलापेक्षा तो कमी असणार नाही".

"हो, खरच! या फुलाचाही वास तेवढाच व तसाच आहे. शिवाय भिजलेल्या मातीचा जो मनोहर वास या फुलाला येतो आहे, तो तर अप्रतीमच आहे".

"पण फक्त एवढ्यासाठीच मी तुला खाली पडलेलं फूल दिलं असं नाही हं! त्या मागे अजूनही काही कारण आहे. म्हणजे मला तरी असं वाटतं".

"काय?"

"खाली पडलेलं फूल हे झाडाने धरणीला वाहिलेलं कृतज्ञतेचं लेणं असतं. झाड कितीही वाढलं, कितीही उंचं आभाळात झेपावलं, तरी त्याची

मूळं धरणीतच असतात. तीच त्याची पालनकर्ती आई असते. रक्षणकर्ती माता असते. तिच्यावाचून त्याला आधारच नसतो. असं खाली पडलेलं फूल त्या झाडाने आपल्या आईबद्दल व्यक्त केलेली कृतज्ञता असते. तिच्या उपकाराची परतफेड म्हणूण झाड तिला आपला एक अंश वाहतो, अर्पण करतो. तिला देण्यासाठी त्याच्याकडे याहून श्रेष्ठ लेणं काय असेल? त्या वाहिलेल्या फुलामध्ये फुलाबद्दल असलेला मायेचा ओलावा असतो, तसेच धरणीसाठी असलेली कृतज्ञता ही असते. पण झाडावरच्या फुलात मात्र मायेचा ओलावाच तेवढा असतो. म्हणूणच देवाला स्वतः तोडून वाहिलेली फूलं आवडतात, कारण त्याची सुद्धा आपल्यावर अशीच माया असते".

"म्हणतात खरं, की देवाला झाडावरचीच फूले वहावी. खाली पडलेली फुले वाहु नयेत".

"नाही, देवाला खाली पडलेली फूलंच जास्त आवडायला हवी. त्या फुलाद्वारे आपल्यालाही देवाबद्दल तेवढच प्रेम व कृतज्ञता आहे असं आपण देवाला सांगू शकतो. अशी फूलंच देवाला जास्त आवडतील".

"तू किती छान बोलतोस रे! असं वाटतं, नुसतं ऐकत रहाव!".

"हंऽऽ ! काँही छान वगैरे बोलत नाही मी. अगं, एवढं सगळं मी तुला सांगितलं, पण शेवटी फूल आपण तोडलं काय किंवा खाली पडलं काय, ते शेवटी झुरणारच. त्याच्या नशीबी झुरणंच असतं. फूल देवाला वाहीलं काय किंवा प्रेयसीच्या केसांत माळलं काय, शेवटी त्याला कचऱ्यातच जायचं असतं. पण त्यांनी देवावर पडण्याचा अट्टाहास धरूच नये असं कोणी सांगितलं? त्यांना ही देवावर पडल्यावर सार्थक झाल्यासारखं वाटत असणारच की! पण फूल स्वतः कधीच 'मला देवच हवा' किंवा 'मला कचऱ्यात न टाकता नदीतच विसर्जित करा' असं म्हणत नाही. माणसानं फुलापासून हा भाव शिकला पाहिजे ".

"म्हणजे? कोणता भाव?".

"हेच, माणूस नेहमी 'मला, मला'च करीत असतो. 'हे माझं, ते माझं' ह्यातच त्याचं सगळं आयुष्य संपून जातं. अरे, कितीही धडपड, तडफड, तगमग केली तरी एक पै ही त्याला सोबत नेता येत नाही. या देहाला आपण सजवतो, फुलवतो, 'मी सुंदर आहे' असा अभिमान आपल्याला असतो. पण एक दिवस या देहाची मातीच होणार आहे, हे फार थोड्यांना कळतं आणि तेच या जन्मोजन्मीच्या चक्रातून मुक्त होतात. तुला एक गम्मत सांगतो. आपल्या शेजारी एक आजीबाई राहतात. त्यांच्या अंगणात एक मोगरा फुललाय. रोज त्याला छान छान फूलं येतात. त्यातली बरीचशी खाली पडून

वाया जातात. आम्ही देवासाठी फूलं घेतो म्हंटल्यावर मात्र त्या रागवतात. म्हणतात, 'आमचं झाड आहे हो! आम्ही देऊ नाही तर न देऊ. हवं तर तुम्ही सुद्धा लावावं एक झाड, आपल्या स्वतःच्या अंगणात!'".

"अरे वा! बऱ्याच दिसताय आजीबाई?"

"हो ना! एवढं वय झालं, सदाशिव पेठी भाषेत सांगायचं तर 'गौऱ्या ओंकारेश्वरी गेल्या', पण सांसारिक वस्तूंवरचा मोह काही सुटत नाही. मी त्यांना म्हणालो की झाडावरची नको, पण खाली पडलेली फूलं तरी देत जा. तर लगेच हो म्हणाल्या".

"ते बरं?"

"बरोबर आहे. अंगण साफ होतं ना! तेवढंच कमी झाडावं लागतं!".

"तू खरच छान बोलतोस. साध्या साध्या गोष्टीतून तत्त्वज्ञान सांगतोस".

"आपण आयुष्यातील किती सत्यांना 'तत्त्वज्ञान' म्हणून बाजूला करतो, नाही? कारण काही सत्यं अशीच असतात. ती कळतात, पण वळत

नाहीत. त्यांना आपण जीवनात स्थान द्यायला घाबरतो. ती फक्त ऐकायलाच गोड वाटतात आणि म्हणूनच त्याला 'तत्त्वज्ञान' म्हणतात. म्हणजे 'तत्त्वज्ञान फार किचकट विषय आहे' असं म्हणूण त्यांना सहज दूर ठेवता येतं! बरं ते जाऊ दे. मी एवढे दिवस भेटलो नाही. फार रागावली असशील?".

"नाही रे! फार नाही! तू भेटावास असं सारखं वाटतं. पण नाही भेटलास ना तरी तुझ्या शब्द-सुमनांचा 'सुगंध' माझ्यासवेतच दरवळत असतो. तो सुगंध मला विरहाचे दुःख होउच देत नाही! पण असं नुसतं भेटणं किती दिवस चालणार? आपलं लग्न कधी होणार?"

"जेव्हा शब्द-सुमनांचा 'सुगंध' विरून जाईल आणि तुला माझ्या विरहाचे दुःख होऊ लागेल, तेव्हा!"

'म्हणजे या जन्मी काही ते शक्य नाही!" आणि आम्ही दोघंही खळखळून हसलो.

०७/०८/२०००

सोमवार, संध्याकाळी ७:००

ठिकाण: दुकान, जालना

# मांदियाळी

खेळ मांडीयेला वाळवंटी खाई । नाचती वैष्णव भाई रे ॥

खरंच! किती अनुपम दृश्य असतं हे. इथे कोणीच एकटा नसतो, दुकटा ही नसतो. इथे लहान मोठे सगळे सारखेच. साऱ्यांच्या मनात एकच भाव, एकच भक्ती. सगळी आपल्या आईला भेटायला आलेली, आपल्या पालनकर्त्या पित्याला भेटायला आलेली. अहो, ते सावळे परब्रह्म हे सर्वांचेच दैवत, मग इथे भेदभाव कसा राहील!

वर्ण अभिमान विसरली याती । एकएकां लोटांगणीं जाती ॥

इथे लहान थोराचा हिशोब नाही. 'मी किती आशीर्वाद घेऊ शकतो' ही चढाओढ. सगळेच एकमेकांच्या पायी लागतात. म्हणून तर "देवा, मला सतत तुझ्या भक्तांच्या पायाशी राहू देत" असे म्हणून मंदिराच्या पायरीमध्ये समाधी घेणाऱ्या नामदेवाला इथे भक्तराज म्हणतात.

विठू माझा लेकुरवाळा । संगे गोपाळांचा मेळा ॥

काय खोटं आहे हो? तो सावळा प्रभू सगळ्यांना आपल्या मांडीवर घेऊन खेळवतो आहे.

निवृत्ती हा खांद्यावरी। सोपानाचा हाथ धरी।
पुढे चाले ज्ञानेश्वर। मागे मुक्ताई सुंदर॥

आपली सगळी प्रतिभा ज्ञानेश्वरास अर्पण करून त्याच्यात स्वतःचीच प्रतिमा तयार करणाऱ्या, "माझ्या कडून शिकून तू लोकांना शिकव" असं ज्ञानेश्वराला सांगणाऱ्या, त्यात त्याला तन-मनाने मदत करणाऱ्या व लोकहितासाठीच प्राणार्पण करणाऱ्या निवृत्तीला खांद्यावर उचलून घ्यायला नको? तो सोपान ही बघा, आपल्या जन्मदात्याचा हाथ धरून, आपल्या दोन्ही भावांबरोबर राहून त्यांना सर्वतोपरी सहाय्य करतो आहे! त्या ज्ञानेश्वराबद्दल तर काय सांगायचं?

दर्पणी पाहता रूप। न दिसे हो आपुले।
बापरखुमादेविवरे। विठ्ठले मज ऐसे केले॥

याला तर जळीं, स्थळीं, काष्ठी, पाषाणी विठ्ठलच दिसतो आहे. दर्पणात सुद्धा स्वतःला न पाहता हा त्या सावळ्या पांडुरंगाचा शोध घेतो आहे आणि सर्वांना सांगतो आहे

कानडा हो विठ्ठलु । कर्नाटकु । त्याने मज लावियेला । वेधु ॥

"त्या कानडी विठ्ठलाने मला वेड लावलंय. तुम्ही सुद्धा त्याचा वेध घ्या, शोध घ्या, आपल्या अंतर्मनात त्याचा ठाव घ्या. तो नक्की सापडेल तुम्हाला! आणि मग तुमच्याइतके सुखी कोण?" असं सांगणारा हा ज्ञानेश्वर साऱ्या जगाला उत्थानाचा, उत्कर्षाचा, भक्तीचा मार्ग दाखवतो आहे.

आणि ती चित्कला आदिमाया मुक्ताबाई! या साऱ्यांना बळ यावं म्हणूण ही शक्ती त्यांच्या पाठीशी सदैव उभी आहे. साऱ्यांना ही धीर देते आहे.

अवघाचि संसार । सुखाचा करीन । आनंदे भरीन । तिन्ही लोक ॥

तुम्ही आम्ही काय संसार करणार? अहो, "सारे जग हाच माझा संसार आहे ! तिन्ही लोक मला आनंदाने भरून काढायची आहेत". याला

जगात इतकं दुःख दिसलं की हा स्वतःचे दुःख विसरुन गेला. दुसऱ्यांचे दुःख दूर करण्यातच आनंद मानू लागला आणि सर्वांना हेच सांगू लागला, "बाबारे! का व्यर्थ दुःख करतोस! अरे, तू थोडा जरी दुसऱ्याच्या उपयोगी पडलास, तरी तुला आयुष्यभर पुरेल एवढं सुख लाभेल!"

दळीता कांडीता । तुज गाईन अनंता ॥

ही नाम्याची जनी! हिला तर विठ्ठलाशिवाय करमतच नाही. सतत त्यालाच आळवीत असते. काय भाव आहे पहा

नित्य हाती कारभार । मुखी हरि निरंतर ॥

अहो, काम कोणाला चुकलंय, पण मुखी हरि-नाम घेत घेत काम केलं तर कामाचं ओझं वाटत नाही. उगीच नाही विठ्ठल जनीकडे दळायला येत! आणि तिही काय म्हणते पहा

लक्ष लागिले चरणासी । म्हणे नामयाची जनी ॥

असा भाव पाहिजे! मग विठ्ठलाला येणे भाग आहे.

नको देवराया। अंत आता पाहू। प्राण हा सवर्था। जाऊ पाहे॥
हरिणीचे पाडस। व्याघ्रे धरीयेले। मजलागी जाहले। तैसे देवा॥
तुजविण ठाव। न दिसे त्रिभुवनी। धावे हो जननी। विठाऊबाई॥
मोकलोनी आस। जाहले उदास। घेई कान्होपात्रेस। हृदयात॥

समाजाने अपमानित केलेली ही निर्मळ हृदयी कान्होपात्रा! सगळीकडुन निराश झाली आहे, कुठेच आधार उरलेला नाही, उदास झाली आहे, आता तिला विठ्ठलापासून विरह सहनच होत नाहीये, त्याला ती करूण आर्ततेने साद घालत आहे, "देवा, आता तरी मला बोलावून घे! तुझ्या शिवाय मला आता कोणी नाही". आज कालची मुलं आपण संकटात सापडल्यावर आधी आईवडिलांकडे जात नाहीत. पण ही कान्होपात्रा मात्र आपल्या हृदयातच वसलेल्या आईला साद घालत आहे. आणि ही विठाई कशी आहे पहा!

माझ्या विठोबाचा। कैसा प्रेमभाव। आपणचि देव। होय गुरु॥

तुकोबाराय काय सांगतात,  त्याच्या सारखा वाटाड्या, गुरू शोधूनही सापडणार नाही. तोच तुम्हाला मार्गदर्शन करतो आहे. पुढे काय तर

मागें पुढें उभा । राहे सांभाळीत । आलिया आघात । निवाराया ॥

आपण एवढी वर्ष जगतो. जन्मल्या क्षणापासून ते मृत्यूच्या एक क्षण आधीपर्यंत कोणाला माहीत असतं, काय घडेल ते? मग कोण सांभाळतं आपल्याला? अहो, तो आपल्या मागे पुढे उभा आहे. आपल्यावर येणारा प्रत्येक आघात सहन करण्याची त्याचीच शक्ती आहे. एवढेच नाही तर

योगक्षेम त्यांचा । जाणे जडभारी । वाट दावी करीं । धरोनिया ॥

कुठला बाप असा आहे की जो शेवटपर्यंत मुलाचा 'योगक्षेम' चालवतो? तर तोच, जो सर्वांचाच बाप आहे, जो सर्वांचीच आई आहे.

तुका म्हणे नाही । विश्वास ज्या मनीं । पहावे पुराणी । विचारुनी ॥

तुकाराम महाराजांनी तर साक्षात पुरावाच आपल्यासमोर ठेवलाय. मग अविश्वास का धरावा? याला म्हणतात खरा गुरू! आणि म्हणूनच तुकाराम महाराजांना जगद्गुरू म्हणतात! तुकाराम महाराज त्या विठ्ठलाकडे काय मागनं मागतात पहा

हेंचि दान देगा देवा। तुझा विसर न व्हावा॥

"देवा, मला दुसरे काही नको. फक्त तुझी ज्योत माझ्या मनामध्ये अखंड तेवत राहू दे! दुसऱ्याला स्वत:चा मार्ग निवडण्यात त्रास होऊ नये यासाठी या ज्योतीचा अखंड वापर होऊ दे. अरे, मला मुक्ति नको आहे, संपदाही नको आहे, समृद्धिही नको आहे, श्रीमंतीही नको आहे! फक्त तुझा सहवास नित्य लाभावा यासाठी संतांच्या सान्निध्यात मला ठेव".

न लगे मुक्ति आणि संपदा। संतसंग देई सदा॥

अशी ही संत मंडळी. त्या ज्ञानेश्वराला तर कधी एकदा पंढरपुरी जाऊन विठ्ठलाला भेटेन असं व्हायचं! मग आम्ही तर साधी माणसं. आषाढ सुरू झाला की आम्हाला ही विरह असह्य होतो आणि आपोआप पाऊलं पंढरीकडे वळतात. तो चिमुकला जीव आपल्या एकविसाव्या वर्षीच गेला, पण समाजाच्या मनात एक पालवी फुलवून गेला.

इवलेसे रोप। लवियेलें द्वारी। त्याचा वेलू गेला। गगणावरी॥

त्याने फुलवलेल्या पालवीला आज अगणित फूलं आलेली आहेत. आपल्या टवटवीतपणामुळे, आपल्या अप्रतिम सुगंधाने आजही ती आम्हाला व अजून सर्व लोकांना आकर्षून घेत आहे. त्यानं मांडलेला खेळ पंढरीच्या वाळवंटात अजूनही रंगतो आहे व साऱ्यांना तृप्त करून सोडतो आहे. तो खेळ खेळल्यावर अजून दुसरं काही करावसंच वाटत नाही. या खेळात

ऊस डोंगा परी। रस नव्हे डोंगा।
चोखा डोंगा परी। भाव नव्हे डोंगा।
कारे भुललासी। वरलीया रंगा॥

म्हणणारा चोखा आम्हाला साथ करतोय.

कांदा मुळा भाजी। अवघी विठाई माझी।
लसून मिरची कोथिंबिरी। अवघा झाला माझा हरि॥

म्हणणारा सावता सोबत असता विठ्ठलाचाच भास होतो आहे.

आणखी किती नावं घ्यावीत! या संतांच्या 'मांदियाळी'त आम्ही पावन झालो आहोत. आता फक्त एकच मागणे आहे

हेचि व्हावी माझी आस । जन्मोजन्मी तुझा दास ॥
पंढरीचा वारकरी । वारी चूको नेदी हरी ॥
संतसंग सर्वकाळ । अखंड प्रेमाचा कल्लोळ ॥
चंद्रभागे स्नान। तुका मागे हेचि दान ॥

देवाचिये द्वारीं । उभा क्षणभरी । तेणें मुक्ति चारी । साधियेल्या ॥
हरि मुखें म्हणा । हरि मुखें म्हणा । पुण्याची गणना । कोण करी ॥

॥ जय जय रामकृष्ण हरि ॥
॥ श्रीकृष्णार्पणमस्तू ॥

*१३/०२/२००१*
*शनिवार, पहाटे ४:००*

साहित्य म्हणजे असतं काय?

जीवनाचे अनुभव असतात, कधी खरे

तर कधी खोटे वाटतील इतके खरे.

जीवनमूल्यांचे आदर्श असतात,

कधी सोपे, कधी अवघड. कधी अशक्यप्राय.

जगण्याच्या चढ उतारांचे आरसे असतात.

कधी अनुभवलेले. कधी न ऐकलेले.

आपल्या मनाचा, आपल्या जीवनाचा आरसा असतो साहित्य.

साहित्यात रमू या.

साहित्यात रमणारा समाज

अधिक सुसंस्कृत, अधिक प्रगतीशील असतो.

प्रगती म्हणजे केवळ समृद्धी नाही ना!

ई साहित्य प्रतिष्ठान.

मराठी साहित्यातील एक कोवळे पान.

एक प्रसन्न अनुभव

www.esahity.com

esahity@gmail.com

9987737237